**श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती**

**राष्ट्रीय सेवा योजना**

**विशेष श्रमसंस्कार शिबीर अहवाल**

**ग्राम – पुसदा, ता. चांदूर बाजार, जि. अमरावती**

**दिनांक: ३ मार्च ते १० मार्च २०२५**

**शिबिराचा उद्देश:**

श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने ग्रामीण भागातील विकास साधण्यासाठी व स्वयंसेवकांमध्ये सामाजिक जाणिवा निर्माण करण्यासाठी विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराद्वारे गावकऱ्यांना विविध उपक्रमांत सहभागी करून घेणे व सामाजिक बांधिलकी जोपासणे हा प्रमुख उद्देश होता.

**राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबीर – प्रथम दिवस – ३ मार्च २०२५**

**आगमन व नोंदणी:**

शिबिरासाठी स्वयंसेवकांचे आगमन ग्राम पुसदा येथे झाले. सर्व स्वयंसेवकांची नोंदणी करून त्यांना शिबिराच्या नियमानुसार गटात विभागले गेले.

**डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांना अभिवादन:**

सर्व स्वयंसेवकांनी प्रगतिशील कृषी विचारवंत डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. त्यांचे कृषी व ग्रामीण विकासासाठीचे योगदान यावेळी उलगडण्यात आले.

**शिबिराची पूर्वतयारी व प्रकल्प पाहणी:**

ग्रामस्थ मंडळींच्या सहकार्याने शिबिरासाठी आवश्यक व्यवस्था करण्यात आली. तसेच, गावातील समस्या आणि गरजा ओळखण्यासाठी ठिकठिकाणी पाहणी करण्यात आली.

**ग्रामस्थांशी संवाद:**

गावातील सरपंच, सदस्य, युवक व ग्रामस्थांशी संवाद साधून गावाच्या गरजा व समस्यांवर चर्चा करण्यात आली. शिबिराच्या माध्यमातून कोणते उपक्रम राबवले जावेत, याविषयी ग्रामस्थांचे मत जाणून घेतले.

**सायंकाळची प्रार्थना व गटचर्चा:**

सायंकाळी ६ वाजता सर्व स्वयंसेवकांनी एकत्र येऊन सामूहिक प्रार्थना केली. त्यानंतर गटचर्चा घेण्यात आली. या चर्चेत प्रत्येक गटाने आपले उद्दिष्ट निश्चित केले व पुढील आठवड्यासाठी कार्ययोजना तयार केली.

## राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबीर – द्वितीय दिवस - ४ मार्च २०२५

दिनांक **४ मार्च २०२५**, सकाळी **६:०० वाजता**, राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराचा द्वितीय दिवस नवचेतना योगक्रिया व प्रार्थनेने सुरुवात झाली. स्वयंसेवकांनी सकाळच्या प्रसन्न वातावरणात योगाभ्यास व प्रार्थनेत सहभागी होऊन दिवसाची सकारात्मक सुरुवात केली.

यानंतर, **सकाळी ९:०० वाजता**, श्रमदान उपक्रम राबविण्यात आला. स्वयंसेवकांनी परिसर स्वच्छता, गटश्रम, वृक्षसंवर्धन आणि अन्य सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. श्रमदानाद्वारे सामाजिक बांधिलकी व श्रमाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

शिबिराचा **उद्घाटन समारंभ सकाळी ११:०० वाजता** सह्याद्री मंगल कार्यालय, पुसदा येथे संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी **डॉ. गजानन कोरपे**, प्राचार्य, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती, होते. उद्घाटन **मा. श्री केशवराव ज. मेतकर**, उपाध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती, यांच्या हस्ते संपन्न झाले.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून **मा. श्री जयवंत (भैयासाहेब) पाटील पुसदेकर**, उपाध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती, तसेच **श्री निळकंठराव देशमुख, श्री जानराव देशमुख, श्री नरेंद्रराव देशमुख, श्री सुरेशराव देशमुख, श्री विजयकुमार सोलव, माजी सरपंच मुकुंदराव देशमुख, सरपंच उज्वल दळवी, श्री श्यामराव देशमुख व श्री राऊत** या मान्यवर अतिथींची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात **प्रशांत देशमुख**, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, यांच्या प्रास्ताविकाने झाली. यानंतर **श्री नरेंद्रराव देशमुख, श्री मुकुंदराव देशमुख व श्री राऊत** यांनी उपस्थित स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. उद्घाटक **मा. श्री केशवराव ज. मेतकर** यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून स्वयंसेवकांचा व्यक्तिमत्त्व विकास आणि समाजसेवेचे महत्त्व विशद केले.

यानंतर, **अध्यक्षीय भाषणात डॉ. गजानन कोरपे** यांनी स्वयंसेवकांना राष्ट्रीय सेवा योजनेच्या मूल्यांची जाणीव करून देत सामाजिक बांधिलकी व नेतृत्वगुण विकसित करण्याचे मार्गदर्शन केले.

सायंकाळी **४:०० वाजता**, बौद्धिक सत्र आयोजित करण्यात आले, ज्यामध्ये **डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या जीवनावर आधारित चित्रफित** दाखविण्यात आली. या सत्रातून स्वयंसेवकांना त्यांच्या कार्याची प्रेरणा मिळाली.

दिवसाचा समारोप **सायंकाळी ७:०० वाजता**, प्रार्थना व स्मृतीगीताने करण्यात आला. या भावनिक व प्रेरणादायी सत्राने संपूर्ण दिवसाच्या उपक्रमांना एक सकारात्मक आणि समर्पित समाप्ती मिळाली.

कार्यक्रमाचे **सूत्रसंचालन निशांत होले** यांनी केले, तर **प्रज्वल वरघट** यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता झाली.

या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या द्वितीय दिवशी उपस्थित मान्यवरांचे प्रेरणादायी मार्गदर्शन, बौद्धिक सत्र व स्वयंसेवकांचा उत्स्फूर्त सहभाग हा शिबिराच्या उद्दिष्टपूर्तीसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरला.

## राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबीर – तृतीय दिवस – ५ मार्च २०२५

**प्रार्थना व योगाभ्यास (सकाळी ६.०० वा.):**

दिवसाची सुरुवात प्रार्थनेने झाली. त्यानंतर सर्व स्वयंसेवकांनी मार्गदर्शकांच्या नेतृत्वाखाली योगाभ्यास केला. योगाभ्यासामुळे शारीरिक व मानसिक ताजेतवानेपणा निर्माण झाला.

**ग्राम स्वच्छता मोहीम (सकाळी ९.०० वा.):**

सकाळच्या सत्रात ग्राम स्वच्छतेचा उपक्रम राबवण्यात आला. शिबिरार्थींनी गावातील विविध ठिकाणी स्वच्छता करून प्लास्टिक कचरा गोळा केला. गावकऱ्यांनीही या उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

**शिवकालीन ऐतिहासिक साहित्यांची प्रदर्शनी (सकाळी ११.०० वा.):**

स्वराज्य सेवा प्रतिष्ठानचे संस्थापक व संचालक **शिवा काळे** यांच्या मार्गदर्शनाखाली **शिवकालीन ऐतिहासिक साहित्य प्रदर्शनी** भरविण्यात आली. या प्रदर्शनीत छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, शस्त्रसज्जता, युद्धनीती, व शौर्य याची सविस्तर माहिती देण्यात आली. ग्राम पुसदा येथील ग्रामस्थ, शालेय विद्यार्थी, शिक्षक व अनेक मान्यवरांनी या प्रदर्शनीला भेट दिली व ऐतिहासिक माहितीचा लाभ घेतला.

**बौद्धिक सत्र (दुपारी ४.०० वा.):**

दुपारी शिबिरार्थ्यांसाठी बौद्धिक सत्राचे आयोजन करण्यात आले.
या सत्रात **यादव इंद्र श्रीराम तरटे** यांनी **"युवा – सामाजिक, सांस्कृतिक व नैतिक जडणघडण"** या विषयावर प्रभावी मार्गदर्शन केले. त्यांच्या विचारांनी शिबिरार्थ्यांमध्ये सामाजिक जागृती व नैतिक मूल्यांची जाणीव निर्माण झाली.

**सायंकाळची प्रार्थना (सायंकाळी ७.०० वा.):**

संपूर्ण दिवसभराच्या कार्यक्रमानंतर स्वयंसेवकांनी सायंकाळी एकत्र येऊन शांतचित्ताने सामूहिक प्रार्थना केली.

**पक्षी निरीक्षण – व्याख्यान (सायंकाळी ७.३० वा.):**

**डॉ. गजानन वाघ**, प्राध्यापक, जीवशास्त्र विभाग, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती यांनी **"विदर्भातील पक्षी"** या विषयावर माहितीपूर्ण व्याख्यान दिले. त्यांनी विविध पक्ष्यांची वैशिष्ट्ये, त्यांचे अधिवास व पर्यावरणातील महत्त्व याबाबत सखोल माहिती दिली.

**कवी संमेलन (रात्री ८.३० वा.):**

रात्री **कवी संमेलन** घेण्यात आले. या संमेलनाचे प्रमुख सत्र **डॉ. स्वप्नील अरसड**, प्राध्यापक, भौतिकशास्त्र विभाग, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती यांच्या सादरीकरणाने रंगतदार झाले. शिबिरार्थ्यांनी आणि शिक्षकांनी कविता सादर करून वातावरण आनंददायी केले.

तृतीय दिवसाचे कार्यक्रम विविध सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक अंगांनी परिपूर्ण होते. शिबिरार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला आणि ग्रामीण समाजाशी संवाद साधत ज्ञान व संस्काराची देवाण-घेवाण साधली.

## राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबीर – चतुर्थ दिवस – ६ मार्च २०२५

**प्रार्थना व योगासने (सकाळी ६.०० वा.):**

दिवसाची सुरुवात नेहमीप्रमाणे प्रार्थनेने झाली. त्यानंतर सर्व स्वयंसेवकांनी योगासने केली. नियमित योगाभ्यासामुळे स्वयंसेवकांमध्ये चैतन्य निर्माण झाले.

**पक्षी निरीक्षण उपक्रम (सकाळी ७.३० वा.):**

ग्राम परिसरात **पक्षी निरीक्षण उपक्रम** घेण्यात आला. **डॉ. गजानन वाघ** यांच्या मार्गदर्शनाखाली स्वयंसेवकांनी विविध पक्ष्यांचे निरीक्षण केले. पक्ष्यांचे प्रकार, त्यांचे जीवनचक्र, अधिवास व पर्यावरणातील महत्त्व याची सविस्तर माहिती देण्यात आली.

**विज्ञान व तंत्रज्ञान कार्यशाळा (११.०० ते २.००):**

ग्राम पुसदा येथील शालेय विद्यार्थ्यांसाठी **विज्ञान व तंत्रज्ञान कार्यशाळा** आयोजित करण्यात आली.

या कार्यशाळेमध्ये **डॉ. वृषाली चौखंडे** आणि **स्वप्नाली चौखंडे** यांनी विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासक्रमावर आधारित **प्रात्यक्षिके** करून दाखवली. विद्यार्थ्यांनी विज्ञानातील विविध संकल्पनांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला आणि त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन वाढविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

**ग्राम स्वच्छता मोहीम (सायंकाळी ५.०० वा.):**

सायंकाळच्या सत्रात स्वयंसेवकांनी पुन्हा एकदा ग्राम स्वच्छतेचा उपक्रम राबवला. गावातील प्लास्टिक व कचरा गोळा करण्यात आला. ग्रामस्थांनीही या उपक्रमात सहभाग घेतल्याने गावात स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण झाली.

**प्रार्थना व गटचर्चा (सायंकाळी ७.०० वा.):**

संध्याकाळी सामूहिक प्रार्थना घेण्यात आली. त्यानंतर गटचर्चा सत्रात प्रत्येक गटाने दिवसभरातील अनुभव शेअर केले. शिबिरातील सहभाग व योगदानावर चिंतन झाले.

**अंतराळशी हितगुज – तारे व ग्रह निरीक्षण (रात्री ८.०० वा.):**

रात्री शालेय विद्यार्थ्यांसाठी **"अंतराळशी हितगुज"** या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

**डॉ. पंकज नागपुरे** यांच्या मार्गदर्शनाखाली दुर्बिणीद्वारे आकाशातील तारे व ग्रह विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले. यावेळी त्यांनी खगोलशास्त्राची मूलभूत माहिती, ग्रह-तारे यांच्या वैशिष्ट्यांबद्दल सविस्तर माहिती दिली.

हा कार्यक्रम अत्यंत रोचक व ज्ञानवर्धक ठरला.

चतुर्थ दिवस शास्त्रीय दृष्टिकोन, पर्यावरण जागरूकता व सामाजिक सहभाग अशा विविध पैलूंनी समृद्ध होता. शिबिरार्थ्यांनी व ग्रामस्थांनी सर्व उपक्रमांमध्ये उत्साहाने सहभाग घेतला. अशा कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन व सामाजिक बांधिलकी वृद्धिंगत होत आहे.

## राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबीर – पाचवा दिवस- ७ मार्च 2025

**प्रार्थना व योगासने (सकाळी ६.०० वा.):**

दिवसाची सुरुवात नेहमीप्रमाणे प्रार्थनेने झाली. प्रार्थने नंतर प्राध्यापक विक्रांत बुटे सर यांनी सर्व स्वयंसेवकांचे योग आणि प्राणायाम चे सत्र घेतले. नियमित योगाभ्यासामुळे स्वयंसेवकांमध्ये चैतन्य निर्माण झाले.

**ग्रामपंचायत अंतर्गत वृक्ष लागवड प्रकल्पाला भेट (सकाळी ८ ते १० वा.)**

दिनांक ७ मार्च 2025 शुक्रवार रोजी सकाळी ८ ते १० या वेळेत आमच्या ग्रामपंचायतीच्या अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या वृक्ष लागवड प्रकल्पास भेट देण्यात आली. या भेटीचा उद्देश पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व समजून घेणे, प्रकल्पाची माहिती मिळवणे आणि प्रत्यक्ष कृती अनुभवणे हा होता.

पुसद ग्रामपंचायत अंतर्गत गावाशेजारील पंडित जमिनीवर ४० हजार वृक्षांची लागवड करून ग्रामपंचायत आणि गावकरी यांच्या मदतीने त्यांचे संगोपन केलेले आहे. आज प्रत्येक वृक्षाची उंची पाच फूट पेक्षा जास्त आहे. या मध्ये विशेषतः सर्व देशी प्रजातीचे वृक्ष आहे. प्रकल्पाअंतर्गत फलद्रूप, औषधी, व छायादार झाडांची निवड करण्यात आली आहे, जसे की आम्र, चिंच, आवळा, अशोक, नीम, साग इत्यादी. ग्रामचाचायांत ने संगोपन करण्या करीता महात्मा गांधी रोजगार हमी योजना अंतर्गत काम करून घेतलेले आहे. यावेळी सूक्ष्मजीवशास्त्र विभाग श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती यांनी तयार केलेले बायो फर्टीलायझर देण्यात आले. या भेटी दरम्यान प्रा. डॉ. सुरेंद्र पाटील सर, पीडीकेव्ही अकोला हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते, औषधी वनस्पती लागवडीविषयी मौल्यवान माहिती आणि त्यांनी मृदा संवर्धन या विषयावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. सोबतच गावाचे सरपंच आणि गावकरी मंडळी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

वृक्ष लागवड प्रकल्प हा केवळ झाडं लावण्यापुरता मर्यादित न राहता, तो एक सामाजिक चळवळ बनवण्याचा प्रयत्न ग्रामपंचायतीमार्फत केला जात आहे. ही भेट अत्यंत प्रेरणादायी ठरली. अशा उपक्रमांत प्रत्येक नागरिकाने सक्रीय सहभाग घेतल्यास निश्चितच आपल्या गावांचे रूपांतर हरित व पर्यावरणस्नेही गावात होऊ शकते.

**आरोग्य तपासणी शिबीर (सकाळी १० ते दुपारी २ वा.):**

दिनांक ७ मार्च 2025 शुक्रवार रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत एक दिवसीय आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्दिष्ट ग्रामस्थांचे व विद्यार्थ्यांचे आरोग्य तपासणे, विविध आजारांविषयी जनजागृती करणे आणि प्राथमिक पातळीवर रोग ओळखणे हे होते. या उपक्रमात विविध संस्थांचा समन्वयातून मोलाचा सहभाग लाभला.

डेंटल कॉलेज अँड हॉस्पिटल, अमरावती (तपोवन, वडाळी रोड) येथील डॉक्टरांनी शिबिरात सहभागी सर्व ग्रामस्थ व विद्यार्थ्यांची दातांची मोफत तपासणी केली. दातांशी संबंधित समस्या, स्वच्छतेच्या सवयी व उपचार याविषयी योग्य मार्गदर्शन करण्यात आले. यानंतर, रेड रिबीन क्लब, अमरावती यांच्या माध्यमातून ईसीजी (हृदयाची चाचणी), बीपी (रक्तदाब तपासणी), आणि किडनीशी संबंधित विविध तपासण्या करण्यात आल्या. या तपासण्यांमुळे लवकर निदान करून पुढील उपचार शक्य होतील.

प्राथमिक आरोग्य केंद्र, तळवेल येथील वैद्यकीय टीमने गावातील नागरिकांबरोबरच शाळेतील विद्यार्थ्यांची ब्लड टेस्ट (रक्त तपासणी) केली. यामध्ये हिमोग्लोबिनची पातळी, शुगर लेव्हल, तसेच इतर प्राथमिक रक्त तपासण्या करण्यात आल्या. यामुळे पोषण स्थिती, साखर व एकंदर आरोग्यस्थितीबाबत आवश्यक माहिती मिळाली. विशेष म्हणजे स्थानिक शाळांतील विद्यार्थ्यांचा देखील या तपासणीमध्ये समावेश करण्यात आला, ज्यामुळे शालेय आरोग्यविषयक निरीक्षणासाठीही उपयुक्त ठरले.

या शिबिरात श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती चे माननीय आजीवन सदस्य सन्माननीय उपस्थित राहिले. त्यांनी शिबिराला शुभेच्छा देत उपस्थितांना आरोग्याविषयी जागरूक राहण्याचे महत्त्व पटवून दिले. स्थानिक शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षकवर्ग यांनी विद्यार्थ्यांना शिबिरात सहभागी करून घेण्यामध्ये मोलाची भूमिका बजावली. विद्यार्थ्यांनीही या उपक्रमात उत्साहाने सहभाग घेतला.

या आरोग्य तपासणी शिबिरामुळे ग्रामस्थांना व विद्यार्थ्यांना मोफत वैद्यकीय सेवा मिळाल्या, तसेच आरोग्य विषयक अनेक प्रश्नांची उत्तरे तज्ज्ञांकडून मिळाली. भविष्यातील आजार ओळखण्यासाठी, उपचार सुरुवातीच्या टप्प्यावर मिळण्यासाठी आणि समाजात आरोग्यविषयक सजगता वाढवण्यासाठी हे शिबिर प्रभावी ठरले. अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने राबविणे ही काळाची गरज असून, या शिबिरामुळे त्यासाठी एक सकारात्मक पाऊल उचलण्यात आले.

**बौद्धिक सत्र (दुपारी ४.०० वा.): डॉ. अंकित काळे (औषधी लागवड व प्रक्रिया)**

दिनांक ७ मार्च 2025 शुक्रवार रोजी दुपारी ४.०० वाजता आयोजित करण्यात आलेल्या बौद्धिक सत्रात विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त आणि ज्ञानवर्धक माहितीचा खजिना उघडला गेला. या सत्राचे मुख्य आकर्षण म्हणजे दोन तज्ज्ञ वक्त्यांचे मार्गदर्शन. डॉ. एस. आर. पाटील, प्राध्यापक, उद्यानविद्या विभाग, पीडीकेव्ही, अकोला यांनी "औषधी लागवड व प्रक्रिया" या विषयावर सखोल मार्गदर्शन करताना औषधी वनस्पतींचे शास्त्रीय महत्त्व, त्यांचे औषधी गुणधर्म, आणि त्याद्वारे निर्माण होणाऱ्या

रोजगाराच्या संधींचे सविस्तर विवेचन केले. त्यांनी तुळस, अश्वगंधा, सर्पगंधा, ब्राह्मी, गवती चहा, सतावरी, व विधारी या औषधी वनस्पतींच्या लागवडीसाठी आवश्यक हवामान, योग्य मातीचा प्रकार, खत व सिंचन व्यवस्थापन, तसेच पीक संरक्षणाच्या पद्धतींबाबत माहिती दिली. औषधी वनस्पतींचे सुकविणे, ग्रेडिंग, पॅकिंग, साठवण, आणि बाजारपेठेपर्यंत पोहोचवण्याचे तंत्र त्यांनी उलगडून दाखवले. यामध्ये फार्मिंगसोबत प्रक्रिया उद्योग उभारण्याची संधी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले, जे युवकांसाठी उद्योजकतेचे द्वार उघडणारे ठरू शकते.

विद्यार्थ्यांना आणि गावकरी मंडळी बागायती शेतीचे महत्त्व पटवून देताना, फळबाग लागवड, झाडांची निवड, लागवडीतील नवीन तंत्रज्ञान, जलसिंचनाचे आधुनिक पद्धती (जसे की ठिबक व तुषार सिंचन), खत व्यवस्थापन, कीडनियंत्रण, तसेच सेंद्रिय शेती व नैसर्गिक शेती यावरील माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवली. त्यांनी पीडीकेव्ही अकोला येथे चालू असलेल्या विविध संशोधन प्रकल्पांचे व कृषी विस्तार कार्यक्रमांचे उदाहरण देऊन विद्यार्थ्यांना शेती क्षेत्रातील करिअर संधी व स्टार्टअप कल्पना यांची माहिती दिली. विशेषतः त्यांनी फळबाग लागवडीमुळे होणारे लांदीव आणि नियमित उत्पन्न, शाश्वत शेतीसाठी झाडांचे महत्त्व, तसेच कृषी पर्यटन, प्रक्रिया उद्योग आणि थेट विक्रीसारख्या नवकल्पनांवर भर दिला.

या सत्रात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. त्यांनी वक्त्यांना प्रश्न विचारून आपली शंका निरसन केली. औषधी शेती, त्यातील भांडवली गुंतवणूक, शासनाच्या योजना, अनुदाने, तसेच बाजारपेठेची उपलब्धता यावर सखोल चर्चा झाली. एकूणच, हे बौद्धिक सत्र विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी, मार्गदर्शक व व्यावसायिक क्षितिज खुले करणारे ठरले. या सत्रामुळे कृषी व औषधी वनस्पती लागवड क्षेत्रात विद्यार्थ्यांना नव्या दिशा मिळाल्या व त्यांनी स्वावलंबी उद्योजक होण्याच्या दृष्टीने विचार करण्यास सुरुवात केली. या कार्यक्रमाकरिता डॉ. अंकित काळे सर प्रामुख्याने उपस्थित होते.

या कार्यक्रमादरम्यान डॉ. निलेश कडू सर राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांचीही उपस्थिती आणि शिबीर त्यांना मार्गदर्शन लाभले.

**प्रार्थना व गटचर्चा (सायंकाळी ७.०० वा.):**

संध्याकाळी सामूहिक प्रार्थना घेण्यात आली. त्यानंतर गटचर्चा सत्रात प्रत्येक गटाने दिवसभरातील अनुभव शेअर केले. शिबिरातील सहभाग व योगदानावर चिंतन झाले.

**सांस्कृतिक कार्यक्रम (सायंकाळी ८.०० वा.):**

दिनांक ७ मार्च 2025 शुक्रवार रोजी सायंकाळी ८ वाजता आयोजित करण्यात आलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाने संपूर्ण वातावरण उत्साहमय आणि आनंददायी झाले. या कार्यक्रमात पूजदा गावातील शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध नृत्य आणि कला प्रकारांचे सुंदर सादरीकरण करून उपस्थितांचे मन जिंकले. त्यांनी सादर केलेल्या लोकनृत्य, देशभक्तीपर गीते, तसेच पारंपरिक सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे संपूर्ण परिसरात उत्सवाचा माहोल निर्माण झाला. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणातून त्यांच्यातील कला, आत्मविश्वास आणि सांस्कृतिक जाणीव अधोरेखित झाली. गावातील स्थानिक ग्रामस्थांनीही या कार्यक्रमात सहभाग घेऊन एकता आणि सामूहिकतेचा उत्तम नमुना सादर केला. काही ग्रामस्थांनी पारंपरिक वाद्ये वाजवून कार्यक्रमात रंग भरला, तर काहींनी लोककला व संगीताच्या माध्यमातून आपली कला सादर केली. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे शिबिरात सहभागी झालेल्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी देखील विविध गाणी, नृत्य, नाटिका, कविता आणि प्रबोधनपर कार्यक्रम सादर करत आपली सर्जनशीलता आणि सांस्कृतिक जाणिवा दर्शवल्या. त्यांच्या सादरीकरणामुळे शिबिरात आलेल्या गावकऱ्यांना नवा अनुभव मिळाला आणि विद्यार्थ्यांना आपल्या कलागुणांचे सादरीकरण करण्यासाठी एक उत्तम व्यासपीठ मिळाले. या कार्यक्रमामुळे गावकऱ्यांमध्ये शिबिराबद्दल आत्मीयता निर्माण झाली आणि विद्यार्थ्यांमध्ये ग्रामीण संस्कृतीबद्दल आदर आणि आपुलकी वाढली. एकूणच, हा सांस्कृतिक कार्यक्रम समाज आणि शिक्षण यांचा सुंदर संगम ठरून, सर्व उपस्थितांसाठी एक अविस्मरणीय अनुभव ठरला.

## राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबीर – सहावा दिवस- ८ मार्च २०२५

**प्रार्थना व योगासने (सकाळी ६.०० वा.):**

दिवसाची सुरुवात नेहमीप्रमाणे प्रार्थनेने झाली. प्रार्थने नंतर प्राध्यापक विक्रांत बुटे सर यांनी सर्व स्वयंसेवकांचे योग आणि प्राणायाम चे सत्र घेतले. नियमित योगाभ्यासामुळे स्वयंसेवकांमध्ये चैतन्य निर्माण झाले.

**प्रभात फेरी - पथनाट्य (महिला सक्षमीकरण) (सकाळी ८.०० वा.):**

सकाळी ८.०० वाजता महिला सक्षमीकरण या महत्वाच्या सामाजिक विषयावर आधारित प्रभात फेरी आणि पथनाट्याचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश गावकऱ्यांमध्ये महिलांच्या हक्कांबाबत जागरूकता निर्माण करणे, लिंग समानतेचा संदेश पोहोचवणे आणि महिलांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक सक्षमीकरणावर प्रकाश टाकणे हा होता. प्रभात फेरीत सहभागी विद्यार्थी आणि शिक्षकांनी "बेटी बचाओ, बेटी पढाओ", "महिला सशक्तीकरण हीच खरी प्रगती",

“शिक्षण हा महिलांचा अधिकार आहे” अशा विविध घोषणा देत संपूर्ण गावातून फेरी काढली. हातात फलक, बॅनर आणि उत्साही आवाजाने गावकरी आकर्षित होत होते.

प्रभात फेरीच्या समाप्तीनंतर गावातील मध्यवर्ती ठिकाणी विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले, ज्यामध्ये स्त्रियांवर होणारे अन्याय, मुलींच्या शिक्षणाची गरज, घरगुती हिंसाचार, मुलींच्या स्वावलंबनाचे महत्त्व यासारख्या सामाजिक मुद्द्यांवर प्रभावी संदेश दिला. या पथनाट्यातील संवाद, अभिनय, आणि सादरीकरण इतके प्रभावी होते की गावकरी थक्क होऊन ते अगदी मनोभावे पाहत होते. काही ठिकाणी ग्रामस्थांच्या डोळ्यांत अश्रूही उभे राहिले. पथनाट्यानंतर उपस्थितांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले.

या कार्यक्रमामुळे महिला सक्षमीकरणाबाबत सकारात्मक विचारसरणी निर्माण झाली. विशेषतः गावातील महिलांना आणि किशोरी मुलींना आत्मभान आणि प्रेरणा मिळाली. विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिकदृष्ट्या नव्हे तर सामाजिक जाणीवेनेही सहभाग घेतल्यामुळे त्यांच्यातील नेतृत्वगुण, संवेदनशीलता आणि सामाजिक बांधिलकी वृद्धिंगत झाली. एकूणच हा उपक्रम जागरूकता निर्माण करणारा, प्रभावी आणि प्रेरणादायी ठरला.

**इंटरनेट आणि डिजिटल साक्षरता कार्यशाळा (विद्यार्थी आणि शेतकऱ्यांसाठी) (सकाळी ११:३० वा.):**

दिनांक ८ मार्च २०२५ शनिवार रोजी सकाळी ११:३० वाजता इंटरनेट आणि डिजिटल साक्षरता कार्यशाळेचे आयोजन विद्यार्थ्यांसह गावातील शेतकऱ्यांसाठी करण्यात आले. या कार्यशाळेचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील नागरिकांना डिजिटल तंत्रज्ञानाची ओळख करून देणे, तसेच इंटरनेटचा प्रभावी व सुरक्षित वापर शिकवणे हा होता. कार्यक्रमाची सुरुवात मार्गदर्शक तज्ज्ञांनी डिजिटल साक्षरतेच्या मूलभूत संकल्पनांपासून केली. त्यांनी संगणक, स्मार्टफोन, इंटरनेट, ई-मेल, सोशल मिडिया, व्हॉट्सॲप, गुगल सर्च, डिजीटल पेमेंट, यूपीआय, मोबाईल बँकिंग इत्यादींचा वापर कसा करावा याचे प्रात्यक्षिकासह सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांनी विविध डिजिटल ॲप्लिकेशन्सविषयी शंका विचारल्या, तर शेतकऱ्यांना "ई-नाम", "महाडीबीटी", "कृषी विभागाचे पोर्टल", "मौसम अंदाज ॲप", "पीक सल्ला प्रणाली" याविषयी माहिती देण्यात आली. तज्ज्ञांनी शेतकऱ्यांना ऑनलाईन नोंदणी, सरकारी योजना, अनुदान अर्ज प्रक्रिया, मोबाईलद्वारे मार्केट रेट्स कसे तपासावेत, यासारख्या अनेक उपयुक्त बाबी समजावून सांगितल्या. त्याचबरोबर सायबर सुरक्षेबाबतही माहिती देत, फसवणुकीपासून कसे सावध राहावे, मजबूत पासवर्ड्स, ओटीपी सुरक्षितता इत्यादींचे महत्त्वही अधोरेखित करण्यात आले.

या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षण, प्रोजेक्ट्स, नोंदणी फॉर्म, डिजिटल लायब्ररी यांचे ज्ञान मिळाले, तर शेतकऱ्यांनीही डिजिटल शेतीकडे उचललेले पहिले पाऊल म्हणून या उपक्रमाचे भरभरून स्वागत केले. एकूणच, ही कार्यशाळा ज्ञानवर्धक, कौशल्य वृद्धिंगत करणारी आणि काळाच्या मागणीनुसार अत्यंत आवश्यक ठरली. विद्यार्थ्यांच्या आणि शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि उत्सुकता स्पष्ट दिसून येत होती. कार्यशाळेच्या शेवटी सर्वांनी अशा उपयुक्त कार्यक्रमांची वारंवार गरज असल्याचे नमूद केले.

**सौ. सुषमा बर्वे बचत गट उद्योग मार्गदर्शन (दुपारी ४ ते ६ वा.)**

दिनांक ८ मार्च २०२५ शनिवार रोजी दुपारी ४ ते ६ वाजता सौ सुषमा बर्वे बचत गट उद्योग मार्गदर्शन कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट गावातील महिलांना बचत गटांच्या माध्यमातून आर्थिक स्वावलंबन आणि उद्योग सुरू करण्यासाठी मार्गदर्शन करणे होते. या मार्गदर्शन शिबिरात गावकरी महिलांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवला गेला, ज्यामुळे कार्यक्रमाची गुणवत्ता आणि प्रभाव दोन्ही वाढले.

सौ सुषमा बर्वे यांनी महिलांना बचत गटांची संकल्पना, त्यांचे फायदे, आर्थिक नियोजन, बचतीचे महत्त्व, आणि बचत गटातून कसे लहान-मोठे उद्योग सुरु करता येतील याची सविस्तर माहिती दिली. त्यांनी कापड विणकाम, खाद्यप्रक्रिया, फळे व भाजीपाला प्रक्रिया, हस्तकला, कुटीर उद्योग, तसेच स्वरोजगाराच्या विविध संधींवर प्रकाश टाकला. या कार्यक्रमात महिलांना शासनाच्या विविध योजना, अनुदान, कर्ज सुविधा, तसेच बँकांशी संपर्क साधण्याच्या प्रक्रियेविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

गावकरी महिलांनी उत्साहाने प्रश्न विचारले व त्यांचे शंकांचे निरसन केले गेले. त्यांना बचत गटांमध्ये नियमित सहभाग घेण्याचे, उद्योग सुरू करताना जोखीम कशी कमी करावी आणि एकत्र काम करण्याचे महत्त्व पटवून दिले गेले. महिलांच्या आत्मविश्वासात वाढ झाली असून, त्यांना आपल्या आर्थिक प्रगतीसाठी नव्या मार्गांचा उपयोग करण्याची प्रेरणा मिळाली.

या मार्गदर्शनामुळे गावातील महिला स्वावलंबी उद्योजक बनण्याच्या दिशेने एक मोठा टप्पा गाठण्यास सज्ज झाल्या व त्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवण्याची शक्यता निर्माण झाली. एकूणच हा कार्यक्रम गावातील महिलांसाठी ज्ञानवर्धक, प्रेरणादायी आणि सामाजिक परिवर्तन घडवून आणणारा ठरला.

## राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबीर – सातवा दिवस- ९ मार्च २०२५

**प्रार्थना व योगासने (सकाळी ६.०० वा.):**

दिवसाची सुरुवात नेहमीप्रमाणे प्रार्थनेने झाली. प्रार्थने नंतर प्राध्यापक विक्रांत बुटे सर यांनी सर्व स्वयंसेवकांचे  योग आणि प्राणायाम चे सत्र घेतले. नियमित योगाभ्यासामुळे स्वयंसेवकांमध्ये चैतन्य निर्माण झाले.

**ध्यान साधना (सकाळी ६.00 ते ७.00 वा.):**

दिनांक ९ मार्च २०२५ रविवार रोजी सकाळी ६ ते ७ वाजता आयोजित ध्यान साधना सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या सत्राचे मार्गदर्शन डॉ. श्रीकांत वडाळ यांनी केले. त्यांनी ध्यान साधनेचे महत्त्व, त्याचा मानसिक व शारीरिक आरोग्यावर होणारा सकारात्मक परिणाम याबाबत सविस्तर माहिती दिली. डॉ. वडाळ यांनी ध्यानाच्या विविध तंत्रांचा परिचय करून दिला, ज्यात श्वासोच्छवासावर नियंत्रण, मनाची एकाग्रता वाढविणे, तसेच तणाव कमी करण्याच्या सोप्या पद्धतींचा समावेश होता.

सत्रात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी आणि इतर उपस्थितांनी ध्यान साधना कशी करावी याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. डॉ. वडाळ यांनी ध्यान करताना मनातील नकारात्मक विचार कसे दूर करावेत, आणि सकारात्मक ऊर्जा कशी निर्माण करावी यावर विशेष भर दिला. त्यांनी सांगितले की नियमित ध्यान केल्यामुळे मनःशांती, आत्मविश्वास, लक्ष केंद्रीत करण्याची क्षमता वाढते तसेच शारीरिक आरोग्यही सुधारते.

संपूर्ण सत्र अतिशय शांततादायक आणि प्रेरणादायी होते. उपस्थितांना ध्यानाचे फायदे समजावून सांगून, ते आपल्या दैनंदिन जीवनात ध्यान साधना अवलंबविण्यासाठी प्रोत्साहित केले गेले. या सत्रामुळे सर्व सहभागी मानसिकदृष्ट्या ताजेतवाने आणि उत्साही झाले. एकूणच, डॉ. श्रीकांत वडाळ यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या ध्यान साधना सत्राने सर्वांना मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्यासाठी एक नवी दिशा दिली.

**आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा (सकाळी  ११.०० वा.):**

दिनांक ९ मार्च २०२५ रविवार रोजी सकाळी ११.०० वाजता आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले, ज्यामध्ये मार्गदर्शनासाठी श्री. सुधीर कोवळे, राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक, अकोला, यांची उपस्थिती लाभली. या कार्यशाळेचा उद्देश विद्यार्थ्यांना आणि ग्रामस्थांना आपत्ती काळातील तत्काळ प्रतिक्रिया, सुरक्षा उपाय आणि बचाव तंत्र यांची माहिती देणे हा होता.

श्री. कोवळे यांनी नैसर्गिक आपत्ती (भूकंप, पूर, दुष्काळ, चक्रीवादळ) आणि मानवनिर्मित आपत्ती (आग, रसायन गळती, अपघात) यासंबंधी मूलभूत माहिती दिली. त्यांनी आपत्ती वेळी प्राथमिक उपचार, आपत्कालीन संपर्क यादी तयार करणे, सुरक्षित ठिकाणी स्थलांतर, आणि आपत्कालीन बॅग तयार ठेवण्याचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी प्रत्यक्ष उदाहरणांद्वारे सांगितले की, योग्य माहिती आणि तत्परता असल्यास मोठ्या प्रमाणात जीवितहानी टाळता येऊ शकते.

कार्यशाळेत विद्यार्थ्यांना आपत्कालीन परिस्थितीत कसे वागावे, याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. त्यांनी फर्स्ट एड, सीपीआर (हृदय बंद पडल्यावर दिली जाणारी मदत), आग लागल्यास बचावाच्या उपाययोजना यासारख्या गोष्टी प्रत्यक्ष करून दाखवल्या. विद्यार्थ्यांनी आणि गावकऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला व शंका विचारून आपल्या ज्ञानात भर घातली.

या कार्यशाळेमुळे उपस्थितांमध्ये आपत्ती परिस्थितीतील सजगता, आत्मविश्वास आणि सामाजिक जबाबदारीबद्दलची जाणीव निर्माण झाली. एकूणच, श्री. सुधीर कोवळे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेली ही कार्यशाळा शिक्षणदायी, प्रेरणादायी आणि काळाच्या गरजेनुसार अत्यंत उपयुक्त ठरली.

**प्रार्थना व गटचर्चा (सायंकाळी ७.०० वा.):**

सायंकाळी ७.०० वाजता प्रार्थना व गटचर्चेचे आयोजन शांत आणि भक्तिपूर्ण वातावरणात करण्यात आले. संपूर्ण दिवसाच्या शिबिरातील विविध उपक्रमांनंतर हा क्षण मनःशांती, आत्मपरीक्षण आणि परस्पर सुसंवादासाठी अत्यंत उपयुक्त ठरला. सत्राची सुरुवात एकात्मतेचे प्रतीक असलेल्या सामूहिक प्रार्थनेने झाली. विद्यार्थ्यांनी आणि उपस्थितांनी एकत्र येऊन सकारात्मक ऊर्जा, सद्भावना आणि कृतज्ञतेची भावना व्यक्त केली.

प्रार्थनेनंतर झालेल्या गटचर्चेमध्ये सहभागी विद्यार्थ्यांनी दिवसभरातील अनुभव, शिकलेल्या गोष्टी, आणि त्यांच्या मनात निर्माण झालेले प्रश्न व विचार मांडले. चर्चेचे विषय विविध होते – सामाजिक जबाबदारी, पर्यावरण जागरूकता, स्त्री सक्षमीकरण, शिस्त, ग्रामीण जीवनाशी साधलेली नाळ, आणि स्वतःमधील बदल. शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे विचार मनपूर्वक ऐकून घेतले आणि योग्य मार्गदर्शन केले.

या सत्रामुळे सहभागींच्या मनात आत्मविश्लेषण, सकारात्मकता आणि समूहभावना निर्माण झाली. एकत्र बसून संवाद साधल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये ऐकण्याची, समजून घेण्याची आणि इतरांच्या अनुभवातून शिकण्याची सवय लागली. गटचर्चेमुळे त्यांचे विचार अधिक स्पष्ट, प्रभावी आणि परिपक्व झाले.

एकूणच, प्रार्थना व गटचर्चा हे सत्र आध्यात्मिक उन्नतीसह वैचारिक समृद्धी घडवून आणणारे ठरले आणि शिबिराच्या अनुभवात एक शांत, विचारप्रवृत्त करणारी समारोपात्मक जाणीव निर्माण झाली.

## राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबीर – आठवा दिवस- १० मार्च २०२५

**प्रार्थना व योगासने (सकाळी ६.०० वा.):**

सकाळी ६.०० वाजता प्रार्थना व योगासने सत्राचे आयोजन शांत, निसर्गरम्य वातावरणात करण्यात आले. दिवसभराच्या विविध उपक्रमांना सकारात्मक व ऊर्जावान सुरुवात मिळावी यासाठी हे सत्र अत्यंत उपयुक्त ठरले. सत्राची सुरुवात सामूहिक प्रार्थनेने झाली. या प्रार्थनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आणि उपस्थितांनी मनोशांती, एकात्मता आणि सकारात्मकतेचा अनुभव घेतला.

प्रार्थनेनंतर प्रा. विक्रांत बुटे मार्गदर्शनाखाली विविध योगासने व श्वसन प्रक्रिया (प्राणायाम) शिकवण्यात आल्या. यात ताडासन, भुजंगासन, वज्रासन, पवनमुक्तासन, आणि सूर्यनमस्कार यांचा समावेश होता. योगासने करताना योग्य श्वासोच्छ्वासाची तंत्रे, आसनांची शारीरिक व मानसिक आरोग्यावर होणारी सकारात्मक प्रभाव, तसेच नियमित योगाभ्यासाचे फायदे विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले.

विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने या सत्रात सहभाग घेतला. अनेकांनी योगाभ्यास करताना मनःशांती व ताजेपणाचा अनुभव घेतल्याचे सांगितले. शिक्षक व मार्गदर्शकांनी योगाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व अधोरेखित केले आणि विद्यार्थ्यांना त्याचे नियमित पालन करण्याचे आवाहन केले.

या सत्रामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वास्थ्य, मनःशांती, एकाग्रता व सकारात्मक विचारसरणी वाढीस लागली. प्रार्थना व योगाच्या समन्वयामुळे एक सुंदर आणि ऊर्जायुक्त सुरुवात घडून आली. एकूणच, हे सत्र शारीरिक आरोग्य, मानसिक स्थैर्य आणि आध्यात्मिक समतोल निर्माण करणारे ठरले.

**समारोपीय कार्यक्रम (सायंकाळी ११: ३० वा.):**

दि. १० मार्च २०२५ सोमवार रोजी सकाळी ११:३० वाजता **समारोपीय** कार्यक्रमाचे आयोजन ग्रामपंचायत पूजा अंतर्गत अत्यंत उत्साही आणि औपचारिक वातावरणात पार पडले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माननीय प्राचार्य डॉ. गजानन कोरपे सर, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती यांनी भूषविले. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी समाजोपयोगी उपक्रमांमध्ये सक्रीय सहभाग घेतल्यास देशाच्या सर्वांगीण विकासात मोलाचे योगदान देता येईल, असे स्पष्टपणे सांगितले.

कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून प्राचार्य केशवराव गावंडे सर, सदस्य, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती, यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी शिक्षणसंस्थेच्या ग्रामीण विकासाबाबतच्या योगदानाचे महत्त्व विशद केले. प्रा. सुभाषराव बनसोड सर, कार्यकारिणी सदस्य, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती यांनी विद्यार्थ्यांना कार्याच्या प्रत्येक टप्प्यावर जबाबदारीने व समाजहिताच्या दृष्टीने विचार करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाला माननीय सुरेशराव खोटरे सर सदस्य, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती,, श्री उज्वल राव दळवी (सरपंच, ग्रामपंचायत पूजा) व श्रीमती रुद्र शिंदे (उपसरपंच, ग्रामपंचायत पूजा) यांचीही उपस्थिती लाभली. त्यांनी ग्रामस्तरावर शिक्षण व सेवाभावाच्या उपक्रमांचे महत्त्व सांगून, ग्रामपंचायत पातळीवरून पूर्ण सहकार्याचे आश्वासन दिले. डॉ. नरेंद्र देशमुख यांनीही उपस्थित राहून कार्यक्रमास आपले पाठबळ दिले.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी सामाजिक भान असलेले विचार मांडले. शैक्षणिक संस्था आणि ग्रामपंचायत यांच्यातील समन्वयातून होणाऱ्या उपक्रमांची सविस्तर माहिती देण्यात आली. समरुपयोग कार्यक्रमाच्या माध्यमातून केवळ ग्रामीण जीवनाचा अनुभव मिळत नाही तर सामाजिक बांधिलकी, नेतृत्वगुण आणि सेवाभाव ही मूल्ये रुजतात, हे या कार्यक्रमात अधोरेखित झाले.

**श्रम संस्कार शिबिराचे उद्घाटन  प्रसंगीश्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. भैय्यासाहेब पुसदेकरसाहेब यांचे स्वागत करताना माननीय प्राचार्य**




**श्रमसंस्कार शिबिर उद्घाटन प्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. केशवराव मेटकर साहेब गावातील वरिष्ठ आजीवन सदस्याचे स्वागत करताना**



**ग्राम पुसदा येथे प्लास्टिक निर्मूलन कार्यक्रमांतर्गत गोळा केलेले प्लास्टिक व संपूर्ण राष्ट्रीय सेवा योजना पथक**




**महिला सक्षमीकरण व जनजागृतीकरण अभियानांतर्गत ग्राम पुसदा येथे पथनाट्य सादर करणारे रा. से. यो. स्वयंसेवक**



ग्राम  पुसदा येथे केलेल्या वृक्ष लागवडीला जैविक खत टाकताना रा. से. यो. स्वयंसेवक




ग्राम पुसदा येथे कार्यशाळेचे साहित्य बनवताना रा. से. यो. स्वयंसेवक



ग्राम पुसदा येथे शिबिर परिसर स्वच्छ करताना रा. से. यो. स्वयंसेवक




ग्राम पुसदा येथे गावातील कचऱ्याचे निर्मूलन करताना रा. से. यो. स्वयंसेवक



ग्राम पुसदा येथेअवकाश निरीक्षण करताना रा. से. यो. स्वयंसेवक



ग्राम पुसदा येथे योग साधना व व्यायाम करताना रा. से. यो. स्वयंसेवक



## ग्राम पुसदा येथे श्रम संस्कार शिबिरादरम्यान आयोजित निशुल्क आरोग्य तपासणी अभियान



## ग्राम पुसदा येथे जनजागृती अभियाना अंतर्गत एकत्र झालेले विद्यार्थी



श्रमसंस्कार शिबिर ग्राम पुसदा येथे विद्यार्थ्यांना परिसरातील पक्षांबद्दल माहिती देताना पक्षी मित्र डॉ. गजानन वाघ




श्रमसंस्कार शिबिर ग्राम पुसदा येथे विद्यार्थ्यांना परिसरातील पक्षी दाखवताना पक्षीमित्र डॉ. गजानन वाघ



**अटल ट्रिंकलिंग लॅब अंतर्गत विद्यार्थ्यांना रोबोटिक्स या विषयावर मार्गदर्शन तसेच प्रात्यक्षिक घेताना आमंत्रित व्यक्ती**



**अटल ट्रिंकलिंग लॅब अंतर्गत विद्यार्थ्यांना रोबोटिक्स या विषयावर मार्गदर्शन तसेच प्रात्यक्षिक घेताना आमंत्रित व्यक्ती**



समारोपीय कार्यक्रमाला उपस्थित सर्व मान्यवर व्यक्ती व महिला कार्यक्रम अधिकारी




ग्राम पुसदा येथे श्रम संस्कार शिबिरादरम्यान आयोजितकार्यक्रमाला भेट देताना रा. से. यो.क्षेत्रीय संचालक संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांच्या चमू सह



**कार्यक्रमाला उपस्थित रा. से. यो. स्वयंसेवक**



**गावातील शाळकरी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये बक्षीस वितरण करताना**



रा. से. यो.कार्यक्रम अधिकारी स्वयंसेवकांना योगा शिकवताना




**आरोग्य तपासणी शिबिरात गावातील लोकांचा तसेच विद्यार्थ्यांचा लाभलेला भरभरून प्रतिसाद**



### आरोग्य तपासणी शिबिरात गावातील लोकांचा ईसीजी तपासणी करताना



### आरोग्य तपासणी शिबिरात गावातील लोकांचा लाभलेला भरभरून प्रतिसाद

